नागरी दलित वस्ती सुधारणा योजना जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करणे व योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता मार्गदर्शक तत्त्वे विहित करणेबाबत- पूरकपत्र.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन पूरकपत्र क्र.दवसु-२०२५/ प्र.क्र.८१/नवि-०४**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय , मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक :- १९/५/२०२६.**

**संदर्भ** :- नगर विकास विभाग, शासन निर्णय, क्र. विघयो- १०२००/१५९२/प्र.क्र.१८९/ नवि-४, दि.५ मार्च, २००२.

**शासन पूरकपत्र :-**

नागरी दलित वस्ती सुधारणा योजना जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपुर्द करणे व योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी करीता मार्गदर्शक तत्त्वे संदर्भाधीन दिनांक ०५/०३/२००२ च्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ७ (ब) मध्ये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार या योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या बांधकाम विषयक कामांसाठीचे रेखांकन/ नकाशे संबंधित नगरपरिषदेसंदर्भात जिल्हा स्तरावरील नगर रचना कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून व महानगरपालिका संदर्भात महानगरपालिकेच्या नगर रचना अधिकाऱ्यांकडून मंजूर करून घेणे आवश्यक राहील, असे नमूद आहे. तथापि, बांधकाम विषयक कामांसाठीचे रेखांकन/नकाशे मंजूर करण्याचा कालावधी नमूद न केल्यामुळे बांधकाम विषयक कामांसाठीचे रेखांकन/नकाशे तयार करण्यासाठी विलंब लागत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

" साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार या योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या बांधकाम विषयक कामांसाठीचे रेखांकन / नकाशे संबंधित नगरपरिषदे संदर्भात जिल्हा स्तरावरील नगर रचना कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून व महानगरपालिका संदर्भात महानगरपालिकेच्या नगर रचना अधिकाऱ्यांकडून १५ दिवसांत मंजूर करण्यात यावेत. "

२. सदर शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१९१२०३०५२६२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUSHILA DHONDIRAM PAWAR

Digitally signed by SUSHILA DHONDIRAM PAWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=be0660f27b88fa30c14d66b8296a2c28478562c6fd9d1d360094fe11409501d5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2D78E8AB53FB3619E69D852CE1492593ABC1DCE1DF4E081AFE790194FB65C97B, cn=SUSHILA DHONDIRAM PAWAR
Date: 2026.05.19 12:04:04 +05'30'

**( सुशिला पवार )**
**उप सचिव, नगर विकास विभाग**

**प्रत :-**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.उपमुख्यमंत्री ( नगर विकास ) यांचे प्रधान सचिव ,मंत्रालय ,मुंबई-३२.
३. मा.राज्यमंत्री ( नगर विकास ) यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई-३२.

४. अपर मुख्य सचिव , वित्त विभाग , मंत्रालय,मुंबई-३२.
५. अपर मुख्य सचिव , सार्वजनिक बांधकाम विभाग , मंत्रालय,मुंबई-३२.
६. प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.
८. विभागीय आयुक्त, सर्व.
९. जिल्हाधिकारी, सर्व.
१०. आयुक्त, सर्व महानगरपालिका,
११. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१४. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१७. जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व
१८. जिल्हा प्रशासन अधिकारी, सर्व
१९. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषद/नगरपंचायती
२०. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.
२१. निवड नस्ती (नवि-०४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

*******